।। श्री गणेशाय नमः ।।

कुणाल वधवा
9765595037
9405171771

श्रीराम बोरवेल्स

जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.



१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.१५ ■ शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर

गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

एसटीचा पंधरा टक्के हंगामी भाडेवाढचा प्रस्ताव परिवहन मंत्र्यांनी फेटाळला; प्रवाशांना दिलासा

मुंबई, दि. १५ : दिवाळीच्या गर्दीच्या हंगामात एसटीच्या प्रवासी भाड्यात करण्यात येणारी प्रस्तावित १५ टक्के हंगामी भाडेवाढ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी नामंजूर केली आहे. आधीच महागाई आणि दुष्काळाच्या संकटामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांवर भाडेवाढीचा अतिरिक्त भार टाकणे योग्य नसल्याची भूमिका त्यांनी घेतली. या निर्णयामुळे दिवाळीच्या काळात एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. यंदाही एक ते पंधरा नोव्हेंबर या कालावधीत प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनाने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सादर केला होता. मात्र, जनतेची सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी हा प्रस्ताव मे टाळून लावला.



दरवर्षी दिवाळीच्या गर्दीच्या काळात प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन एसटीच्या प्रवासी भाड्यात हंगामी वाढ केली जाते. दुष्काळामुळे अडचणीत सापडलेले शेतकरी, वाढत्या महागाईमुळे आर्थिक ओढाताण सहन करणारे नागरिक आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना संघर्ष करणाऱ्या सर्वसामान्यांना आणखी आर्थिक भार सहन करावा लागू नये, यासाठी हा निर्णय घेतल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. संकटाच्या काळात जनतेच्या अडचणी समजून घेऊन तिला दिलासा देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ग्रामीण क्षेत्रासाठी लालपरी महत्त्वाची

एसटीची लालपरी ही ग्रामीण महाराष्ट्रातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक आणि **(पान ४ वर)**

राज्यात सहा नोव्हेंबरपासून एसटी ची चाके थांबणार?

मुंबई, दि. १५ : राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक आणि प्रशासकीय मागण्यांवरून पुन्हा एकदा संपाचे सावट निर्माण झाले आहे. प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचारी संघटनांनी सहा नोव्हेंबरपासून राज्यव्यापी कामबंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मागण्यांबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा, यासाठी मुख्यमंत्र्यांना सविस्तर निवेदन पाठविण्यात आले आहे. संप झाल्यास राज्यातील एसटी वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता असून, त्याचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसू शकतो.

एसटी कर्मचाऱ्यांना दर महिन्याच्या सात तारखेला नियमित वेतन मिळावे. राज्य सरकारी **(पान ४ वर)**

मतदार यादीत नाव नोंदणीसाठी विशेष मोहीम राज्यभर १७, १८, २४, २५ ऑक्टोबरला शिबिर

मुंबई, दि. १५ : राज्यातील एकाही पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून वंचित राहू नये, यासाठी भारत निवडणूक आयोग आणि राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राज्यभर विशेष मतदार नोंदणी मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेअंतर्गत १७, १८ तसेच २४ आणि २५ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी या शिबिरांना भेट देऊन प्रारूप मतदार यादीतील आपले नाव तपासावे आणि आवश्यक असल्यास २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दावे व हरकती सादर कराव्यात, असे आवाहन निवडणूक विभागाने केले आहे.



या विशेष मोहिमेचा उद्देश पात्र मतदारांची नोंदणी सुनिश्चित करणे, मतदार यादीतील त्रुटी दूर करणे आणि नागरिकांना नोंदणी प्रक्रियेसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. विशेष शिबिरांच्या दिवशी मतदान केंद्रांवर केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित राहून नागरिकांना नवीन मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती आणि इतर आवश्यक प्रक्रियांबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

राज्यभर निवडणूक यंत्रणा कार्यरत

विशेष मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील ३६ जिल्हा निवडणूक अधिकारी, २८८ मतदार नोंदणी अधिकारी, सात हजार १०० सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि एक लाख२५३ केंद्रस्तरीय अधिकारी कार्यरत आहेत. या यंत्रणेमार्फत मतदार यादी तपासणी आणि नोंदणीसंबंधी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. प्रारूप मतदार यादीत नाव आढळले नाही किंवा वैयक्तिक तपशिलात दुरुस्ती आवश्यक असल्यास नागरिकांनी संबंधित नमुन्यात अर्ज सादर करावा. **(पान ४ वर)**

निधी द्या, अन्यथा शहादा नगरपालिका गुजरात किंवा मध्य प्रदेशात हस्तांतरित करा- नगराध्यक्ष पाटील

नंदुरबार, दि.१५ (प्रतिनिधी)- जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून शहादा नगरपालिकेला विकासकामांसाठी निधी मिळत नसल्याचा आरोप शहाद्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी केला आहे. शहादा नगरपालिकेला विकासकामांसाठी निधी द्या, अन्यथा नगरपालिका गुजरात किंवा मध्य प्रदेशात हस्तांतरित करा, अशी आक्रमक मागणी त्यांनी केली. या मागणीसाठी गुरुवारी (दि. १५ ऑक्टोबर) त्यांनी नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण सुरू केले.



शहादा नगरपालिकेने विकासकामांसाठी निधी मिळावा, यासाठी एकमताने ठराव मंजूर करूनही निधी दिला जात नसल्याचा मुद्दा नगराध्यक्ष पाटील यांनी उपस्थित केला. जिल्हा नियोजन समितीकडून लोकसंख्येच्या निकषानुसार निधीचे वितरण होत असेल, तर शहादा नगरपालिकेला निधीपासून वंचित का ठेवले जात आहे, असा सवाल त्यांनी केला. निधीअभावी शहरातील विकासकामे रखडत असल्याने प्रशासन आणि पालकमंत्र्यांच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

शहादा नगरपरिषद ही नंदुरबार जिल्ह्यातील टीएसपी क्षेत्राबाहेरील एकमेव नगरपालिका असल्याचे सांगत, निधीवाटपात दुजाभाव केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. जनता विकास आघाडीकडून नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या अभिजीत पाटील यांनी राज्यातील तिन्ही सत्ताधारी पक्षांकडून सहयोगी सदस्यत्व **(पान ४ वर)**

अनिल नगरात घरफोडी रोकड, दागिने लंपास

नंदुरबार, दि.१५(प्रतिनिधी)- नंदुरबार शहरातील अनिल नगर, सहारा टाऊनजवळील प्लॉट क्रमांक २४ (ब) येथील बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने, घड्याळे आणि ८० हजार रुपयांची रोकड असा एकूण ४ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी गोपाल भगवान राऊत (वय ३३, व्यवसाय) यांनी फिर्याद दिली आहे. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजेपासून १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचे **(पान ४ वर)**

अत्याधुनिक स्वीपर गाड्या व स्वर्गरथ चेसीसचे नगराध्यक्ष चिंतनभाई पटेलांच्या हस्ते लोकार्पण

शिरपूर, दि.१५- शहराच्या स्वच्छतेला अधिक गती देण्यासह नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शिरपूर-वरवाडे नगरपालिकेच्या ताफ्यात दोन अत्याधुनिक स्वीपर गाड्या आणि एका स्वर्गरथाच्या चेसीसची भर पडली आहे. माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली या वाहनांची खरेदी करण्यात आली. मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी नगरपालिका परिसरात लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते तिन्ही वाहनांचे पूजन व लोकार्पण करण्यात आले.



या प्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई अमरिशभाई पटेल, उपनगराध्यक्षा संगीताताई देवरे, बांधकाम सभापती वासुदेव देवरे, नगरसेवक माधवराव पाटील, प्रशासकीय अधिकारी संजय हसवाणी, राजेश भोई, मामा पाटील, स्वच्छता निरीक्षक सागर उतारी यांच्यासह नगरपालिका पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कर्मचारी उपस्थित होते. शहर स्वच्छता व **(पान ४ वर)**

पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर गुन्हा

धुळे, दि.१५- अवैध दारूविक्रेत्यांवर कारवाईसाठी गेलेल्या पोलिस पथकावर हल्ला झाल्याची घटना मोरदड तांडा (ता. धुळे) येथे घडली. या प्रकरणी दहा ते बारा जणांविरुद्ध धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

मोरदड तांडा येथे जत्रा बंदोबस्तासाठी पोलिस पथक तैनात होते. त्यावेळी परिसरात अवैध दारूविक्री होत असल्याची माहिती मिळाली. पोलिस खातरजमा करण्यासाठी गेले. त्यावेळी संतप्त झालेल्या जमावाने एकत्र येत पोलिसांना शिवीगाळ करून दगड-विटांनी त्यांच्यावर हल्ला केला. याप्रकरणी घटनेनंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. **(पान २ वर)**

ज्येष्ठ नागरिकांच्या हक्काचा विजय

वयोवृद्ध पित्याला त्रास देणाऱ्या मुलाला घर एका महिन्यात खाली करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

धुळे, दि.१५- पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या भरण-पोषण व कल्याण कायद्यांतर्गत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका महत्त्वपूर्ण निकालात वयोवृद्ध वडिलांच्या बाजूने दिला आहे. स्वतःच्या कष्टाच्या घरातून हकालपट्टी झालेल्या ८५ वर्षीय वयोवृद्ध पित्याला दिलासा देत न्यायालयाने मुलाला घर एका महिन्यात खाली करण्याचे कडक आदेश दिले आहेत. या प्रकरणात याचिकाकर्त्या वयोवृद्ध पित्यांतर्फे विधिज्ञ ॲड. नितीन एल. चौधरी यांनी काम पाहिले.

प्रकरणाची पार्श्वभूमी

धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा (ता. शिंदखेडा) येथील ८५ वर्षीय भिकमचंद जैन यांनी स्वतः च्या कष्टाने उभे केलेल्या नवजीवन बिल्डिंग मधील घरात राहण्यावरून त्यांच्या ४५ वर्षीय मुलासोबत वाद सुरू होता. वृद्ध वडिलांना त्यांच्याच घरातून बेघर करून त्रास दिल्याप्रकरणी वडिलांनी ज्येष्ठ नागरिक कायद्यांतर्गत अर्ज दाखल केला होता. या प्रकरणी आधीच्या प्राधिकरणाने वडिलांच्या बाजूने निकाल देत मुलगा विनायककुमार जैन याला घर खाली करण्याचे आदेश दिले होते. मात्र, या आदेशाविरुद्ध अपिलीय प्राधिकरणाने दिलेला निकाल वडिलांच्या विरोधात गेल्याने त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

न्यायालयाचा निर्णय

मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाचे न्यायमूर्ती श्री. अजित बी. कडेठणकर साहेब यांनी दोन्ही बाजूंच्या युक्तिवादांनंतर स्पष्ट केले की, मुलाने आपल्या वृद्ध पित्याला त्यांच्याच स्वकष्टार्जित मालमत्तेपासून वंचित ठेवले आहे. अपिलीय प्राधिकरणाचा निर्णय चुकीचा असल्याचे सांगत न्यायालयाने तो रद्दबातल ठरवला आणि प्रांत अधिकारी शिरपूर यांचा मूळ **(पान २ वर)**



मिल परिसरातील दुकानाला भिषण आग तीस लाखांचे नुकसान; जीवीतहानी नाही

धुळे, दि.१५- मील परिसरातील तुळसाबाईचा मळा येथील गुरुकृपा स्टोअर्स या दुकानाला आज पहाटे ३ वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. ही आग इतकी भीषण होती की दुकानातील संपूर्ण माल जळून झाला आहे. या आगीत सुमारे तीस लाखांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे बंब घटनास्थळी दाखल झाले होते. सुर्दवाने या घटनेत कोणतीही जीवीत हानी झाली नाही. (पान २ वर)

महिला केवळ शेतीचा आधार नाहीत तर कुटुंबाला सावरणारी खरी ताकद- पालकमंत्री जयकुमार रावल

धुळे, दि.१५- सकाळी घरातील कामे आटोपून शेताची वाट धरणारी, उन्हातान्हात पेरणीपासून निंदणी, कोळपणीपर्यंत राबणारी आणि पुन्हा कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी महिला ही खऱ्या अर्थाने शेतीचा कणा आहे. कुटुंबावर संकट आले, आर्थिक अडचणी निर्माण झाल्या, तरी हिंमत न हारता कुटुंबाला सावरण्याचे सामर्थ्य महिलांमध्ये असते. त्यांच्या कष्टांचा केवळ गौरव न करता त्यांना समान संधी, आर्थिक स्वावलंबन आणि योग्य सन्मान मिळाला पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.



सेवा संकल्प अभियानांतर्गत कृषी विभाग, आत्मा, धुळे आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आज हिरे भवन येथे आयोजित महिला शेतकरी मेळावा व प्रदर्शनाला पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित केले. यावेळी आमदार मंजूळा गावित, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. गिरीश पाटील, मत्स्यव्यवसाय विभागाचे सहायक आयुक्त डॉ. जयेश बलकटे, जि.प.चे महिला व बालविकास विभागाचे कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व महिला शेतकरी उपस्थित होत्या.

पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले की, शेती करणाऱ्या महिलेच्या कष्टाला वेळेचे बंधन नसते. **(पान ४ वर)**



अनुसूचित जमातीत असूनही आरक्षण नाही जाब विचारत धनगर समाजाचा भव्य मोर्चा

धुळे, दि. १५ (प्रतिनिधी) : स्वातंत्र्य मिळवून ऐंशी वर्षे झाली. संविधानाने अधिकार दिला. राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश असलेल्या धनगर समाजाला आरक्षणापासून वंचित ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप होत आहे. भाजप सरकारने २०१४ च्या निवडणुकीत सत्तेवर आल्यास पहिल्याच कॅबिनेटमध्ये धनगर आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, अनेक वर्षे उलटूनही हा शब्द पाळला गेला नसल्याने, आता धनगर समाजाने राज्यभरात आक्रमक पवित्रा घेतला आहे. मराठवाड्यानंतर आता खानदेश आणि उत्तर महाराष्ट्राच्या मातीतून या आंदोलनाचा एल्गार पुकारण्यात आला आहे. जोपर्यंत दिलेल्या आश्वासनाची पुर्तात केली जात नाही तोपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे. आरक्षणासह अन्य मागण्या घेऊन धनगर समाजातर्फे गुरूवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

सरकार आपल्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे आता समाजाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. गावागावात जाऊन धनगर समाजाला जागृत करण्याचे काम सुरू झाले आहे. मराठवाड्यानंतर आता खानदेश आणि उत्तर महाराष्ट्रात या आंदोलनाची ठिणगी पडली आहे. येत्या काळात पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भासह संपूर्ण राज्यभर हा लढा तीव्र केला जाणार आहे. जोपर्यंत फडणवीस आणि मोदी सरकार आपला दिलेला **(पान २ वर)**

दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -1,35,000 रु.+3% GST
सोने- 24 K -1,46,750 रु.+3% GST
चांदी- 2,12,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



दुष्काळ निवारणासाठी संधारणाच्या कामांना गती द्या प्रत्येक थेंब जमिनीत जिरवा- जिल्हाधिकारी विसपुते

धुळे, दि. १५- दुष्काळाशी सामना करणाऱ्या धुळे जिल्ह्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते जमिनीत जिरले पाहिजे, जलसाठ्यांची क्षमता वाढली पाहिजे आणि भूजल पातळीत सुधारणा झाली पाहिजे. यासाठी जलसंधारणाची कामे वेळेत पूर्ण करून त्याचा प्रत्यक्ष फायदा शेतकरी आणि गावकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील जलसंधारणाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून दुष्काळाच्या दीर्घकालीन उपाययोजनांना गती द्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या अध्यक्षतेखाली जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक ३.० **(पान ४ वर)**

ऑनलाइन गेममध्ये तरुणाची अडीच लाखात फसवणूक

धुळे, दि.१५- ऑनलाइन खेळामध्ये पैसे दुपटीचे आमिष दाखवून तरुणाची अडीच लाखात फसवणूक केली, याप्रकरणी धुळे सायबर पोलिस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

हेमंत ज्ञानेश्वर वाघमारे (वय २३, रा. सारोळे, ता. भोर, जि. पुणे) याने दिलेल्या फिर्यादी दिली, त्यानुसार १९ जुलै ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत हेमंत वाघमारे याने ऑनलाइन गेम संकेतस्थळांवर पैसे गुंतवले. आर जे २२२, साई ऑनलाइन, बॉस ७७७, एमके७७७ या संकेतस्थळांच्या चालकांनी गेम खेळून पैसे **(पान ४ वर)**

पोलीस असल्याची बतावणी करत तीन लाखांचे दागिने लांबवले

नंदुरबार, दि.१५ (प्रतिनिधी)- पोलीस असल्याची बतावणी करून वृद्ध दाम्पत्याला अडवित त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख १२ हजार ५०० रुपयांचा ऐवज चार अनोळखी इसमांनी लंपास केल्याची घटना १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास प्रकाशा ते नंदुरबार रस्त्यावर शिंदे गावाच्या फाट्याजवळ, शमशेरपूर परिसरात घडली.

रुपसिंग खंडू गिरासे (वय ७१, रा. गांधीनगर, नंदुरबार) हे पत्नी बालुबाई यांच्यासह तळोदा तालुक्यातील कळेल येथून अंत्यविधीचा कार्यक्रम आटोपून मोटारसायकलने नंदुरबारकडे येत होते. यावेळी दोन मोटारसायकलींवरून आलेल्या चार अनोळखी इसमांनी त्यांना अडविले. आपण पोलीस असल्याची बतावणी करून त्यांनी दाम्पत्याकडील सोन्याचे दागिने व रोख रक्कम काढून घेतली आणि तेथून पलायन केले.

या घटनेत बालुबाई गिरासे यांच्या हातातील ७ तोळे वजनाच्या सोन्याच्या दोन बांगड्या, किंमत १ लाख ८९ हजार **(पान ४ वर)**

घरफोडी करणारी आंतरराज्य टोळी एल.सी.बी.पथकाने केली गजाआड

धुळे, दि.१५- शहरातील चाळीसगाव रोड परिसरात दिवसा घरफोडी केल्याप्रकरणी तीन जणांची टोळी पोलिसांनी निष्पन्न केली. त्यातील दोघांना अटक केली असून ५ लाख ६९ हजार ४५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांनी घरफोडी, चोरीच्या गुन्हयाची उकल केली.

व्यावसायिक प्रणय राजेंद्र खंडेलवाल (रा. शिव वसंत अपार्टमेन्ट, शिंदेनगर, धुळे) यांचे घरातील लॉकरमध्ये ठेवलेले एकुण ४ लाख १२ हजार ६०० रुपयांचा सोने-चांदीचे दागिने व रोकड ख रक्कम चोरुन नेली, सात ऑक्टोबर दुपारी दोन ते साडेतीनच्या सुमारास घटना घडली होती. याप्रकरणी चाळीसगावरोड पोलीस ठाणे येथे घरफोडीचा गुन्हा दाखल झाला होता. गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा, धुळे करतांना पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांच्या सुचना **(पान ४ वर)**

शिरपुरात अठ्ठेचाळीस हजारांचा गुटखा जप्त

शिरपूर दि.१५ (का.प्र.)- शहरातील एसपीडीएम कॉलेजसमोर अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांच्या संयुक्त कारवाईत ४८ हजार ४०० रुपये किंमतीचा गुटखा जप्त करण्यात आला.

संजय खटनमल माखिजा (वय ४१, रा.आकाश गार्डनजवळ, कृष्णा नगर, शिरपूर) असे संशयिताचे नाव आहे. १३ ऑक्टोबरला दुपारी पावणेचारला तो एसपीडीएम महाविद्यालयासमोरुन जात असतांना ताब्यात घेऊन झडती घेतल्यावर **(पान २ वर)**



चिखली गावातील वीज पुरवठा खंडीत तक्रारींकडे दुर्लक्ष; नागरिक वैतागले

साक्री, दि.१५- साक्री तालुक्यातील चिंपी मोहानी अंतर्गत येणाऱ्या चिखली गावातील डीपी जळाल्याने वीजपुरवठा ठप्प झाला. महावितरणच्या कर्मचाऱ्यांना वारंवार सांगूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या वीज समस्येचे तातडीने निराकरण करून गावाचा वीजपुरवठा पूर्ववत करावा, पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, मोबाईल टॉवर सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणेशी समन्वय साधावा, शेतीपंपांना वीज उपलब्ध करून द्यावी आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळे दूर करावेत, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

वीज नसल्याने गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही विपरीत परिणाम होत आहे. रात्री अभ्यास करताना विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असून, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसमोरही अडथळे निर्माण झाले आहेत. एका बाजूला डिजिटल शिक्षणाचा गाजावाजा होत असताना दुसरीकडे विद्यार्थ्यांना **(पान २ वर)**

आपला महाराष्ट्र

सीजेपी आणि जेपींच्या आंदोलनातील मूलभूत फरक

२०१४ नंतर प्रथमच सत्ताधाऱ्यांच्या विरोधात तरूणाई सीजेपी अर्थात कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून रस्त्यावर उतरलेली दिसते. त्यांनी एक पराक्रम केला आणि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला. हे सरकार कोणाच्याच पुढे नमणार नाही अशी खूणगाठ भारतीय जनतेने बांधून घेतली होती. विविध क्लुप्त्या करून जिंकून येणे सहज शक्य असल्याने ती प्रक्रिया देखील जनतेला कळली होती. पण जनता काहीच करू शकत नव्हती. लोकशाही असूनही एकतर्फी कारभाराचा अतिरेक झाल्यामुळे आणि संसदेत देखील विरोधी पक्षांना नामोहरम करण्याचे कार्यक्रम सतत चालू असल्याने शासक पक्षाच्या अगदी जवळच्या कुटुंबांत असलेल्या तरुणांनी मात्र न भूतो न भविष्यती उठाव केला. जंतर-मंतर त्यांनी आंदोलनाचे लक्ष केले. जैन झीची आणि अल्फा ची नवीन व्याख्या याच आंदोलनापासून उदयाला आली. त्यांच्या पाठोपाठ देशातील विरोधी पक्षांनी एकजूट करून एस आय आर शी संबंधित मुद्द्यांना हात घातला. त्यांनीही सरकारला धारेवर धरले. सध्या जे आंदोलन चालू आहे ते चिरडून टाकण्यासाठी सरकारने हर तऱ्हेचे प्रयत्न केले. पण तरुणाई आणि विरोधी पक्ष काही बधत नाही. तद्वतच सरकार देखील ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या संदर्भात हलत नाही. राजाचा जीव पोपटाच्या जीवात असल्याची एक कथा आहे तसे या संदर्भात घडत आहे. या दोन्ही आंदोलनांची तुलना अनेकांनी जेपींच्या आंदोलनाशी केलेली आहे. लोकनायक जयप्रकाश नारायण यांचा ८ ऑक्टोबरला स्मृती दिवस होता. १२ ऑक्टोबरला त्यांची जयंती होती त्यानिमित्ताने या मुद्द्याचा परामर्श घेणे आवश्यक वाटले. कुठल्या आंदोलनाची तुलना कोणत्या आंदोलनाशी करणे हा प्रत्येकाच्या अभिव्यक्तीचा आणि अधिकाराचा भाग आहे. परंतु वस्तुस्थिती लक्षात घेता हे आंदोलन जेपींच्या आंदोलनाशी मुळीच मिळते जुळते नाही. काही उद्दिष्टे जरूर जेपींच्या आंदोलनाशी जुळत असतील पण म्हणून काही जेपींच्या आंदोलनाची आवृत्ती म्हणून याकडे बघता येणार नाही.

जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीचे स्वप्न केवळ सत्ता परिवर्तनापुरते मर्यादित नव्हते. राजकारणात नैतिकता, सामाजिक न्याय आणि लोकशाहीमध्ये जनतेचा सक्रिय सहभाग असणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यांच्या जयंतीनिमित्त हा प्रश्न उपस्थित होतो की, आजची लोकशाही जनतेला खऱ्या अर्थाने सत्ता आणि अधिकार देऊ इच्छित नाही. जेपी यांचा वारसा सांगताना आपल्याला याच प्रश्नांवर आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.. स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या पिढीसमोर लोकशाहीचा खरा अर्थ काय, हा प्रश्न निर्माण झालेला आहे..

जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन याच प्रश्नाशी जोडलेले आहे. त्यांची जयंती म्हणजे केवळ एका महान नेत्याचे स्मरण करण्याचा दिवस नसून लोकशाहीला आरसा दाखवण्याचा दिवस आहे. कारण जेपींनी ज्या संपूर्ण क्रांतीचा बिगुल वाजवला होता त्याचा आवाज आज लुप्त झालेला जाणवतो. १९७४ मध्ये तरुणाई लोकनायकांच्या नेतृत्वाखाली केवळ सरकार बदलण्यासाठी मैदानात उतरली नव्हती तर व्यवस्थेला अधिक उत्तरदायी, समाजाला अधिक न्याय्य आणि राजकारणाला अधिक नैतिक बनवण्याची आकांक्षा तिच्या मनात होती. हे तत्व अर्थातच गांधीजींचे आहे.त्यांचा पाठपुरावा त्यावेळी झाला होता.त्यामुळे आज विरोधी पक्ष रस्त्यावर उतरला असेल, तर जेपी यांच्या कसोटीवर त्यालाही हाच प्रश्न विचारावा लागेल. आजचे आंदोलन सत्ता परिवर्तनाऐवजी व्यवस्था परिवर्तनाचे आहे का हा मुद्दा उपस्थित करण्याचा आहे.म्हणूनच जेपी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना श्रद्धांजली वाहणे म्हणजे केवळ त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करणे नव्हे. एखाद्या तरुणाने भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवला, पत्रकाराने सत्तेला प्रश्न विचारले, शेतकऱ्याने आपल्या हक्कांसाठी संघटित होण्याचा निर्णय घेतला, कामगाराने सन्मानाची मागणी केली आणि एखाद्या नागरिकाने अन्यायासमोर गप्प राहण्यास नकार दिला, तर तीच खरी श्रद्धांजली ठरणार आहे. हाच खरा जेपींच्या आणि आजच्या आंदोलनाच्या संदर्भातील फरक म्हणावा लागेल. ते आंदोलन आजही आवश्यक आहे. कारण संपूर्ण क्रांती ही एका दिवसात पूर्ण होणारी घटना नव्हती. ती समाजाला सातत्याने बदलण्याची प्रक्रिया होती. सत्ता बदलू शकते, सरकारे बदलू शकतात, राजकीय आघाड्या बदलू शकतात आणि पिढ्याही बदलू शकतात; परंतु समाज अधिक न्याय्य बनवण्याची, राजकारण अधिक नैतिक करण्याची आणि लोकशाही अधिक सहभागी बनवण्याची गरज कधीही संपत नाही. त्या दृष्टीने जेपींच्या आंदोलनाकडे बघावे लागेल.

जेपी लोकशाहीकडे केवळ निवडणूक व्यवस्था म्हणून पाहत नव्हते. निवडणुका हा लोकशाहीचा अनिवार्य भाग असला तरी पण तो लोकशाहीचा संपूर्ण उद्देश नाही. स्वतंत्र प्रसारमाध्यमे, स्वायत्त संस्था, नागरिकांचे अधिकार, मतभिन्नतेचा आदर, सत्तेत असलेल्यांचे उत्तरदायित्व आणि जनतेचा सक्रिय सहभाग हे लोकशाहीचे प्राण आहेत मानले जातात. त्याचा संकोच होत असताना १९७५ मध्ये दिसले.यावर्षी आणीबाणी लागू झाली, तेव्हा नागरिकांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आल्या, प्रसारमाध्यमांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांना अटक करण्यात आली. अशा वेळी जेपी यांनी लोकशाही अधिकारांच्या रक्षणासाठी आवाज उठवला. त्यांची प्रकृती खालावलेली होती; परंतु लोकशाही वाचविण्यासाठी त्यांची बांधिलकी कायम होती. गांधीजींच्या आणि विनोबांच्या सहवासात ते राहिलेले होते. नेहरूंना आणि समकालीन नेत्यांना जवळून ओळखत होते. तेवढीच त्यांची उंचीही होती. आता तसा नेता नाही हा आजच्या आणि त्या काळातील आंदोलनातील मूलभूत फरक आहे.

सत्ताधारी समूहात सर्व काही अलबेल झालेले आहे असे गृहीत धरून गप्प राहणे आणि एका अर्थाने सत्तेच्या जवळ राहणे ही लोकशाहीतील तत्त्वांचे पालन करण्याची वृत्ती असू शकत नाही. तर लोकशाहीची खरी परीक्षा सत्तेशी असहमती व्यक्त केली जाते तेव्हा होते. सत्तेच्या बाजूने बोलणे सोपे असते. सध्या जे भक्त आणि अंधभक्त आहेत त्यांच्याकडून तेच होत आहे. अगदी अराजक निर्माण करण्याचे समर्थन देखील ही मंडळी करते. त्यांची संख्या अधिक असून सत्तेला प्रश्न विचारण्याचा अधिकार सुरक्षित ठेवणाऱ्यांची संख्या ही त्यामानाने कमी आहे. म्हणून आतापर्यंत कोणी बाहेर पडत नव्हते. आणि तीच खरी लोकशाहीची कठीण जबाबदारी आहे.

आणीबाणीनंतर १९७७ मध्ये सत्तापरिवर्तन झाले. दीर्घकाळ केंद्रात सत्तेवर असलेल्या काँग्रेसला जनतेने प्रथमच सत्तेबाहेर घालविले. मात्र, जनता पक्षातील अंतर्गत मतभेद आणि नेतृत्वासाठी सुरू झालेल्या संघर्षाने हेही दाखवून दिले की, विकासाचा लाभ नेमका कोणापर्यंत पोहोचतो. शिक्षणाबाबतही जेपी यांचा दृष्टिकोन व्यापक होता. शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन नसून व्यक्तीला समाजाप्रति जबाबदार बनवण्याचे माध्यम असले पाहिजे. आज शिक्षण रोजगार आणि बाजाराच्या गरजांपुरते मर्यादित होत असताना जेपी यांचा हा विचार अधिकच महत्त्वाचा ठरतो. आजच्या तरुणाईच्या दृष्टिकोन तो आहे का असा प्रश्न उपस्थित होतो आणि त्याचे उत्तर नकारार्थी येते. पत्रकारितेची भूमिकाही महत्त्वाची आहे. जेपी यांच्या काळात सत्तेला प्रश्न विचारण्याचे आव्हान पत्रकारितेसमोर होते. आजही लोकशाहीला अशा पत्रकारितेची गरज आहे मात्र तशी ती दिसत नाही. तसे झाले तरच जेपींचा वारसा सांगता येईल. जयप्रकाश नारायण समाजवादी होते, गांधीवादी होते आणि स्वातंत्र्यसैनिक देखील होते. त्याही पलीकडे जाऊन निद्रिस्त भारतीयांच्या मनात चेतना निर्माण करणारे व्यक्तिमत्व त्यांचे होते. त्या दृष्टीने त्यांच्या आणि आजच्या आंदोलनाकडे बघावे लागेल. तुलना करणे ठीक आहे पण वास्तव तसे नाही याचेही भान विश्लेषकांना असले पाहिजे.

धुळे येथे वाचनालयावर झालेल्या कारवाईविरोधात जनआंदोलन

धुळे, दि.१५- धुळे येथील देवपूर भागातील क्रांतीसूर्य-डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयफ या २५ ते ३० वर्षांपासून सुरू असलेल्या सुस्थितीतील इमारतीवर महापालिकेने बेकायदेशीर व मनमानी पद्धतीने पाडकाम कारवाई केल्याचा आरोप वाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

कोर्टाचा निकाल वाचनालयाच्या बाजूने लागूनही आणि महापालिकेला दंड व जागेच्या बदल्यात जागा/असा आदेश दिलेला असतानाही, मनपा प्रशासनाने आदेशाची अंमलबजावणी न करता न्यायालयाचा अवमान केला असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

प्रमुख मागण्यांमध्ये वाचनालयाची इमारत पाडणाऱ्या दोषी मनपा अधिकाऱ्यांवर त्वरित निलंबनाची व ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी. अधिकाऱ्यांकडून १५ लाख रुपयांची वैयक्तिक भरपाई वसुली करून वाचनालयाला देण्यात यावी. मुख्यमंत्री निधीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयास १५ लाख रुपयांची मदत त्वरित मंजूर करावी. आदींचा समावेश आहे. येत्या १५ दिवसांत संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई न झाल्यास, धुळे शहरातील सर्व आंबेडकर प्रेमी, भिम सैनिक आणि विविध संघटनांच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वाचनालयाचे अध्यक्ष गोविंद कांबळे यांनी दिला आहे.

चिखली गावातील वीज पुरवठा खंडीत

(पान १ वरून) पुरेशा प्रकाशात अभ्यास करण्यासाठी संघर्ष करावा लागणे ही गंभीर बाब आहे.

शेतकऱ्यांची परिस्थितीही वेगळी नाही. शेतीपंपांना वीज मिळत नसल्याने शेतीच्या कामांवर परिणाम होत आहे. पिकांना पाणी देण्यास अडचणी येत असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे. पिण्याचे पाणी, शिक्षण, शेती आणि दळणवळण या सर्वच बाबींवर वीजपुरवठा बंद असल्याचा परिणाम जाणवत आहे.

चिखली गावातील डीपी जळाल्यानंतर वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांना वारंवार माहिती देण्यात आली. मात्र, आठ महिन्यांचा कालावधी उलटूनही समस्या सुटली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

ग्रामस्थांच्या व्यथा ऐकल्यानंतर तालुका काँग्रेस अध्यक्ष भानुदास गांगुर्डे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे या समस्यांचा पाठपुरावा केला. केवळ निवेदन देऊन न थांबता त्यांनी चिखली गावाला प्रत्यक्ष भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.

चिखली गावातील गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन भानुदास गांगुर्डे यांनी खासदार ॲड. गोवाल पाडवी यांच्याशी संपर्क साधला. ग्रामस्थांनी त्यांच्यासमोरही आपल्या समस्या मांडल्या. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांची भानुदास गांगुर्डे यांची भेट घेऊन गावातील सर्व समस्यांच्या निराकरणासाठी लवरात लवकर कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.या पाठपुराव्यामुळे चिखली ग्रामस्थांच्या प्रश्नांना आता वाचा फुटली असली, तरी प्रत्यक्षात वीजपुरवठा कधी सुरू होणार, डीपीची दुरुस्ती किंवा बदल कधी होणार, मोबाईल टॉवर कधी कार्यान्वित होणार आणि पाणीटंचाईतून ग्रामस्थांची सुटका कधी होणार, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

मिल परिसरातील दुकानाला भिषण आग

मिल परिसरातील तुळसाबाईचा मळा येथे भटू सुपनर व हनुमंत सुपनर या बंधूंचे गुरुकृपा स्टोअर्स हे दुकान आहे. आज पहाटे तीन वाजेच्या सुमारास श्री एकवीरा देवीच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांना या दुकानातून धूर व आग निघत असल्याचे दिसले. सदर माहिती तातडीने दुकानमालक सुपनर यांना कळविण्यात आली. त्यानंतर सुपनर बंधुंनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली, तोपर्यंत आगीने रौद्र रुप धारण होते. या घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशामक दलाला कळविण्यात आले चार बंबांच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. दरम्यान, धुळे शहराचे तलाठी किशोर बडगुजर यांना फोन करुन नुकसानीचा पंचनामा करण्याची सूचना केली. दरम्यान, सदर आग ही शॉर्टसर्कीटमुळे लागल्याची शक्यता वर्तवली जात असून या आगीत सुमारे ३० लाखांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.

शिरपुरात अठ्ठेचाळीस हजारांचा गुटखा जप्त

पिशवीमध्ये विमल पान मसाल्याची २२० पाकिटे व विमल तंबाखूची २०० पाकिटे असा मुद्देमाल आढळला. अन्न सुरक्षा अधिकारी अभिजीत जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संशयितावीरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक निरीक्षक वर्षा पाटील तपास करीत आहेत.

पान १ वरुन

अनुसूचित जमातीत असूनही आरक्षण नाही

शब्द पाळत नाही, तोपर्यंत हा संघर्ष असाच सुरूच राहणार, असा स्पष्ट इशारा आजच्या एल्गार मोर्च्यातून देण्यात आला. धनगर समाजाच्या एल्गार मोर्चाची सुरुवात चाळीसगावरोडवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून झाली. जुना आग्रारोड मार्गे पाचकंदील चौक, त्यानंतर पुढे रणसिंग चौकातून महापालिकेच्या जुन्या इमारती समोरून मोर्चा पुढे सरळ जेलरोडवर आला. या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. मोर्चाचे नेतृत्व करणारे दीपक बोराडे यांच्यासोबत राजस्थान येथील धनगर समाजाचे नेते जयसिंग रायकर उपस्थित होते. सभेच्या प्रसंगी उपस्थितांना संबोधन करण्याअगोदर जेलरोडवर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्ण कृती पुतळायला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मोर्चाचे नेतृत्व करणारे दीपक बोराडे यांनी मार्गदर्शन केले.

वयोवृद्ध पित्याला त्रास देणाऱ्या मुलाला घर एका

आदेश बहाल केला. तसेच, संबंधित मुलाने एका महिन्याच्या आत दोंडाईचा येथील राहती मालमत्ता (घर) पूर्णपणे खाली करून ती वयोवृद्ध वडिलांच्या स्वाधीन करावी, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले आहेत. आदेशाचे पालन न केल्यास अतिरिक्त तहसीलदारांमार्फत सक्तीने ताबा काढून घेण्याचे आणि न्यायालयाच्या आदेशानुसार २० हजार रुपयांचा खर्च न दिल्यास तो महसुली थकबाकीप्रमाणे वसूल करण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर गुन्हा

याप्रकरणी हवालदार ललित दत्तात्रय खळगे (४२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जालीदर सरीचंद पवार, नकुल सरीचंद पवार, नवनाथ सरीचंद पवार, दीपक अनिल पवार, चेतन गोकुळ पवार, आप्पा सरीचंद पवार, अनिल सरीचंद पवार, सुनील सरीचंद पवार, धीरज नकुल पवार (सर्व रा. मोरदड तांडा, ता. धुळे) यांच्यासह अन्य पाच ते सहा जण यांच्याविरुध्द धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

जाहीर नोटीस

अर्जदार वकील ॲड. एन. व्ही. पवार

शिंदखेडा येथील मे.न्यायदंडाधिकारी साहे१ वर्ग -१ यांचे न्यायालयात

फौ. कि. अर्ज नं. १७६/२०२६

गुलाबराव गंगाराम पाटील
उ.व.-७९ धंदा-पेन्शेनर
रा.वारूड ह.मु.श्रीराम नगर भुसावळ
ता.भुसावळ जि.जळगाव ...अर्जदार

।।वि।।

ग्रामपंचायत /ग्रामविकास अधिकारी
वारूड ता.शिंदखेडा जि.धुळे ..जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी स्वतःचा जन्म मौजे वारूड ता.शिंदखेडा जि.धुळे येथे दि.१३/०८/१९४७ रोजी झाल्याबाबतची नोंद जन्म रजिस्टर मध्ये घेणेबाबत म.निंबधक (जन्म-मृत्यू) ग्रामपंचायत वारूड ता.शिंदखेडा जि.धुळे यांना आदेश व्हावेत व तसा जन्मचा दाखला देणेबाबतचा आदेश व्हावेत ह्या साठी मे.न्यायालयात उपरोक्त अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जन्म नोंद प्रकरणी कोणाची काही हरकत तक्रार असल्यास त्यांनी दिनांक १९/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० मे.न्यायालयात स्वतः अगर वकिलाप्रतिनिधी मार्फत उपस्थित होवून लेखी हरकत नोंदवाव्यात. मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास पुढील सुनावणी घेण्यात येवून जन्मनोंद घेण्याविषयी पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. काळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे. न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस दैनिक आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे.शिदखेडा ता.०६/१०/२०२६

सही... सही...
कामगिरी कारकून सहाय्य अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, शिंदखेडा जि. धुळे

जाहीर नोटीस

नि.९

शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. वरीष्ठ स्तर यांचे कोर्टात

प्रोबेट (संप्रमाण) अर्ज नं. ०४/२०२६

श्री.संजय भिला बडगुजर उ.व. ५१, धंदा - शेती
रा. वाडी बुा. ता.शिरपूर, जि.धुळे ... अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ..जाबदेणार
कै. देवकाबाई भिला बडगुजर
(मृत्यू ता.१५/०३/२०२६)
रा. वाडी बुा.ता.शिरपूर,जि.धुळे .. मयत

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी दि इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ चे कलम २७६ अन्वये प्रोबेट मिळण्यासाठी अर्ज शिरपूर येथील म.दिवाणी न्यायाधीश सो. वरिष्ठ स्तर, शिरपूर यांच्या न्यायालयात मयत देवकाबाई भिला बडगुजर यांनी त्यांच्या हयातीत दि.१९/०४/२०१८ रोजी त्यांचे स्वतःचे मालकीच्या स्थावर मिळकतीची विल्हेवाट त्यांच्या मर्जीने होण्यासाठी मृत्यूपत्र केले आहे. सदरच्या मृत्यूपत्राचे प्रोबेट मिळण्यासाठी सदरचा अर्ज अर्जदार यांनी मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि.०२/११/२०२६ ही निश्चित केलेली आहे. त्या अर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास शिरपूर येथील म.दिवाणी न्यायाधीश सो. वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात वर निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही, काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. दि.१४/१०/२०२६

सही... सही...
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय,शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

जाहीर नोटीस

नि.०७

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.९३६/२०२६

१) तापाबाई हिरालाल उर्फ हिलाल कुंभार
२) वसंत हिलाल कुंभार ३) राजेंद्र हिलाल कुंभार
४) रविंद्र हिलाल कुंभार नं. १ ते ४ कुंभारटेक, थाळनेर,ता.शिरपूर,जि.धुळे
५) इंदुबाई शालिक कुंभार
रा.कुंभारटेक, अमळनेर,ता.अमळनेर,जि.जळगाव ...अर्जदार

विरूद्ध

दिलीप हिलाल कुंभार रा.गणपूर, ता.चोपडा, जि.जळगाव ...जाबदेणार

X

कै.हिलाल धुडकू कुंभार
(मृत्यू दि.२१/०५/१९९९) रा.कुंभार टेक, थाळनेर,ता.शिरपूर,जि.धुळे .. मयत

ज्याअर्थी मयत हिलाल धुडकू कुंभार हे दि.२१/०५/१९९९ रोजी मौजे- कुंभार टेक,थाळनेर,ता.शिरपूर,जि.धुळे येथे मयत झालेले असून, अर्जदार व जाबदेणार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी तसचे औपचारीक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्य आत दि.०६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल.दि.१२/१०/२०२६

सही... सही...
कनिष्ठ लिपीक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय,शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.ज्युडी. मॅजी. सो. वर्ग १ यांचे न्यायालयात

क्रि. कि. अर्ज नं. २६०/२०२६

संगीताबाई राजेंद्र बंजारा, रा.भोईटी, पो.रोहिणी, ता.शिरपूर,जि.धुळे. ...अर्जदार

विरूद्ध

म.ग्रामपंचायत अधिकारी सो.,
ग्रामपंचायत भोईटी,
ता.शिरपूर,जि.धुळे. ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार हिचा मुलगा नामे दिनेश राजेंद्र बंजारा याचा जन्म दि.२७/१०/२०१२ रोजी मौजे भोईटी, ता.शिरपूर,जि.धुळे येथे झाल्यामुळे महाराष्ट्र जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३-अ) प्रमाणे जन्म नोंद होवून मिळणेबाबत अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि.२६/११/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पूढील कारवाई करण्यात येईल.

दि.१४/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिले असे.

सही... सही...
कनिष्ठ लिपीक सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय,शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

कन्साई गटातील गावांमध्ये पाणी टंचाई उपाययोजना करा- काँग्रेसचे निवेदन

शहादा,दि.१४(प्रतिनिधी)- तालुक्यातील कन्साई गटातील अनेक गावांमध्ये भीषण पाणी टंचाई असल्याकारणाने संबंधित गावात ताबडतोब पाण्याची व्यवस्था करावी म्हणून शहादा तालुका काँग्रेस पार्टी मार्फत अतिरिक्त जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार यांना निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, कंसाई गटातील आंबापाणी ,केरलापाणी, हाऱ्यापाडा, उमरापाणी, कोटबांधणी, आमलीपाणी या गावातील नागरिक मागील अनेक वर्षांपासून नदीच्या पाण्यावरच अवलंबून होते. नदीचं त्यांचा जीवनाचा आधार होता. मात्र यावर्षी शहादा तालुक्यात अत्यंत कमी पाऊस झाल्याने अनेक नद्यांना पाणीच नाही. त्यामुळे तेथील नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तरी महाशयांनी ताबडतोब संबंधित गाव-पाड्यांमध्ये पाण्याची व्यवस्था करावी असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याप्रसंगी शहादा काँग्रेस पार्टी तर्फे ॲड.राजेंद्र ठाकरे, जगदीश पवार, ओंकार पटले, दिवाण पावरा तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रकाश में आज- शतरंज



राजेंद्र कुमार वहीदा रहेमान महेमूद हेलन शाम कुमार मदनपुरी शशीकला आगा कमलकपूर





शब्दकोडे क्रमांक.२४७३

१	२	३	■	४	५		■	६		७	
८			९	■		■	१०		■		■
	■	११			■	१२		■	१३		१४
१५	१६	■		■	१७	■	१८	१९		■	
■	२०	२१	■	२२	■	२३			■	२४	
२५			२६	■	२७		■	२८	२९	■	
३०		■	३१	३२	■	३३	३४	■	३५	३६	
	■	३७	■	३८		■	३९				■
४०	४१	■	४२		■	४३		■		■	४४
■	४५	४६		■	४७		■	४८		४९	
५०			■	५१		■	५२		■	५३	
५४		■	५५	■	५६			■	५७		■

आडवे शब्द : १.मंथन ४.कामुक ६.एक जगप्रसिद्ध धबधबा ८.तांबडट १०.हिंदीत-वहीणी ११.विजया दशमी १२.संगीतातील पहीले सप्तक १३.संगीतातील एक राग १५.'पळसाला पाने ..'एक म्हण १८.वारा २०.थोडेसे २३.सहाय्य २४.शुद्ध २५.सादयंत वाचणे २७.बघा २८.स्त्रियांच्या नाकातील एक दागिना ३०.पाठीचे हाड ३१.गोटया खेळताना पाडलेला लहान खडडा ३३.हवे-विरूद्ध ३५.रसरशीत ३८.बटटा ३९.रायगड जिल्हयात येणारी एक प्रसिद्ध खळ ४०.फायदा ४२.रक्षा ४३.हिंदीत-शुद्ध,जाणीव ४५.रोकड ४७.माता ४८.लगेच ५०.एक काटेरी झाड ५१.दर ५२.चारपाई ५३.मपा-उलट लिहा ५४.नौका ५६.लोभ ५७.समय **उभे शब्द :** १.विदेशी २.कुटील डाव ३.सैन्याचे अन्न-धान्य ५.काठी ६.बेंबी ७.एक शेंग भाजी ९.जीवा १०.गणेश चतुर्थी येते तो महीना १३.गरदन १४.वाहन उभी करण्याची जागा १६.भेट,उपहार १७.झाडाचे मूळ १९.देश २१.उपदेश २२.संगीत सप्तकातील अखेरचा स्वर २३.थोर २५.जेवण बनवण्याची कला २६.गण-उलट लिहा २९.लक्ष्मीकांत बेर्डे,महेश कोठारे यांचा एक सिनेमा ३२.भारतातील सर्वात उंच रस्ता वा युदधभूमी असलेले ठिकाण ३४.प्रयत्न-हिंदीत ३६.कथेचा मुख्य गाभा ३७.नाही-विरूदध ४१.वेगाने ४२.दशरथ पुत्र ४३.४३.होलिका ४४.प्रियकर ४६.कलिका ४७.बाब ४८.कापड ४९.भाल ५०.खबर ५२.लहान खळगा ५५.स्वत: स उददेशून वापरलेला एकवचनी शब्द

शब्दकोडे क्रमांक.२४७२ चे उत्तर

का	र	खा	ना	■	का	स	व	■	फ	रा	र
ठ	■	स	मा	स	■	ह	ल	क	ट	■	पे
मां	डी	■	व	■	ह	वा	य	■	क	प	ट
डू	■	स	ली	म	■	स	■	को	ळ	सा	■
■	प	त्ता	■	ल	स	■	ना	य	■	रा	डा
ख	डा	■	स	म	र	स	■	ता	न	■	वा
स	व	ल	त	■	स	ब	क	■	र	ती	■
ख	■	ग	ल	त	■	ब	र	ग	डी	■	वि
स	जा	■	ज	व	स	■	व	र	■	मौ	का
■	य	स	■	र	■	था	ली	■	म	■	र
अ	दा	ल	त	■	पा	प	■	ग	रा	डा	■
■	द	मा	■	का	ढा	■	त	ला	ठी	■	ढ



बोराडी गावात महिलांना मारहाण

शिरपूर दि.१५ (का.प्र.)- घराचे बांधकाम सुरु असतांना वाद उफाळल्याने दोन महिलांना मारहाण करुन गंभीर जखमी केल्याने तीन जणांविरोधात सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सखूबाई मोतीराम गोपाळ (वय ७५, रा.बोराडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांना हरिपुरा येथे संशयितांनी सेंट्रींग कामाचा लोखंडी रॉड उचलून मारहाण केली तर तिची सून आशाबाई राजेंद्र गोपाळ हिला विटेने मारहाण केली. संशयित पंकज चिंतामण गोपाळ, अनिल चिंतामण गोपाळ व पमाबाई चिंतामण गोपाळ (सर्व रा.बोराडी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन –मौजे धुळे ता.जि. धुळे येथिल स.नं. गट क्रमांक व उपविभाग ५२१/३/ब/ पैकी प्लॉट नं.६ चे एकुण क्षेत्र १०५ चौ.मी. आकार ७१रू.५० पैसे चा बखळ प्लॉट अशी मिळकत यासी

यासी	मापे	चतु:सिमा
पूर्वेस	०७ मी.	९ मी रस्ता
पश्चिमेस	०७ मी.	गट नं. ५२१/४
दक्षिणेस	१५ मी.	प्लॉट नं. ७
उत्तरेस	१५ मी.	प्लॉट नं. ५

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील मिळकत ही श्री.निलेश रमेश भडागे रा.धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांचा कडुन सदर मिळकत ही आमचे अशिल यांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असुन सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडुन त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्तयावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटुन शहानिशा करुन खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध व श्री.निलेश रमेश भडागे रा.धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकीची असल्याचे गृहीत धरून खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातुन घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधणकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरून त्यांचेतर्फेत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि.१५/१०/२०२६

ॲड. ललित पांडुरंग देठे
चव्हाण कॉम्प्लेक्स,
सुरतवाला बिल्डींग जवळ, मिल परिसर,
धुळे **मो. ९४२२७०७१२७४**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि. धुळे येथिल सर्व्हे नं.९/२/१/३ पैकी प्लॉट नं.३३ चे क्षेत्र १७० चौ.मी. यापैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र ८५ चौ.मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं.३४, पश्चिमेस / याच प्लॉट नं.३३ पैकी भाग, दक्षिणेस : प्लॉट नं.२८, उत्तरेस : रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत सौ. नंदा वसंत चव्हाण, रा.१८, तिरूपती नगर, देवपुर, धुळे यांचे मालकीची असुन त्यांनी नमुद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, हितसंबंध, देणे घेणे, वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुराव्यानिशी करुन शहानिशा करुन खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध व श्री.निलेश रमेश भडागे रा.धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकीची असल्याचे गृहीत धरून खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातुन घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधणकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरून त्यांचेतर्फेत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि.१५/१०/२०२६

ॲड. विजय म. मोरे
नोटरी –भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे **मो. ९८२२८५२६५०**

जाहीर नोटीस

धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील दुसाने ता.साक्री गाव व शिवारातील तमाम जनतेस आमचे पक्षकार लक्ष्मण सदाशिव भदाणे (पाटील), रा.दुसाने,ता.साक्री,जि.धुळे हल्ली मु. प्लॉट नं. ११ नर्मदा नगर, वलवाडी शिवार, देवपूर, धुळे यांनी दिलेल्या माहितीवरून जाहिर नोटीस देण्यात येते की, सदाशिव धुडकु पाटील रा.दुसाने हे आमच्या अशिलांचे जन्मदाते वडील आहेत. त्यांच्या नावे वडीलोपार्जीत दुसाने शिवार गट नं. २६९/७ हे.१ आर ८१ आकार रूपये २.३० पैसे ही शेत जमीन महसुल दप्तरी आहे. सदाशिव पाटील यांना दोन मुले आहेत. त्यापैकी आमचे अशिल हा मोठा मुलगा आहे. आमच्या अशिलांना आता नुकतेच कळाले आहे की, सदाशिव पाटील हे वर नमुद शेत जमीन आमच्या अशिलांचा कायदेशीर रित्या हिस्सा डावलून दुसऱ्या व्यक्तींशी कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या प्रयत्नात आहेत. सदर शेत जमीनीत आमच्या अशिलांच्या कायदेशीर वारसदार म्हणून हक्क व हितसंबंध आहेत. सदर जमीनीच्या बाबतीत श्री. सदाशिव धुडकु भदाणे पाटील यांच्याशी वर नमुद शेत गट नंबर बाबतीत कोणीही गहाण, विक्री, हस्तांतरणाचा व्यवहार करू नये तसे केल्यास तो व्यवहार आमच्या पक्षकारांवर बंधन कारक राहणार नाही व तो व्यवहार रदद करण्याकामी न्यायालयीन कारवाई करावी लागेल.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे. धुळे दि.१५/१०/२०२६

(सदरची नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन आमच्या मार्फत दिली असे)

ॲड. चिंतामण एस. पाटील **मो. ९८९०८३७८५३**
१०, कुलस्वामीनी, नर्मदानगर, वलवाडीशिवार, देवपूर, धुळे

टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस

तमाम जनतेस बॅकांना हितसंबंधितांना सदर टायटल व्हेरिफिकेशन जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळेतीचे वर्णन :- मौजे लंळीग,ता.जि.धुळे येथिल लंळीग ग्रामपंचायत हदीतील गट नंबर ७८/१ भोगवटदार वर्ग-०१, जिरायत शेत जमीनीचे एकुण ला.ला.क्षेत्र.हे.३.२४ आर+पो.ख.क्षेत्र. हे.२.२४आर असे एकुण क्षेत्र.हे.५.४८आर,आकार रू.०२,००पै. यापैकी खाते क्रं.१२८०२, चे ला.ला.क्षेत्र.हे.१.०८ आर पो.ख. क्षेत्र. हे.०.७५ आर असे एकुण क्षेत्र.हे.१.८३आर, आकार रू.००.६७पै. जिरायत शेत जमीन येण्या जाण्या करीता जुन्या वहिवाटीप्रमाणे आहे व राहील.

यासी मापे व चतु:सिमा मंजुर गाव नकाशा प्रमाणे

येणे प्रमाणे चतु:सिमेतील बांधीव मिळकत ही **अल्का मोहन भदाणे,चुडामण नरायण पाटील,रविंद्र बापुराव भदाणे,सुनिता राजु भदाणे,**सर्व रा:- मु.पो.अवधान,ता.जि.धुळे यांचे नावे महसुल दप्तरी फेरफार नोंद क्रं.६१८२ अन्वये त्यांचे नावे प्रमाणित होती व आहे.

अशी त्यांची कब्जे उपभोगातील वहीवाटीतील मिळकतीची त्यांचे सांगणेवरून आमचे मार्फत टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारे हित संबध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपटटा वा लिज, ताबा, गहाण, बोजा, टाच वा वारस, खावटी असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्यांचे ०७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्राच्या प्रति सहीत आमचे ऑफिसांत हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहिर नोटीस वर्तमान पत्रांत आल्यांस त्या ग्राहय धरण्यांत येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकार हे सदर मिळकतीचे बोनाफाईड पर्चेसर आहेत असे समजले जाईल व सदर मिळकत ही निर्वेध व निर्बोज म्हणुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक असणार नाही. सदर पेपर नोटीस ही आमचे मार्फत आमचे अशिलांनी दाखविलेल्या कागदपत्रावरून व त्यांनी तोंडी कथन केलेल्या माहीतीवरून व दिलेल्या अधिकारावरून देण्यात आलेली आहे. येण प्रमाणे जाहीर नोटीस होय. धुळे दिनांक :-१५/१०/२०२६

ॲड. योगेश सुभाष शिंदे
एफ. ४४, पहिला मजला स्किम ए. गरुड मैदान संकुल कमलाबाई शाळेसमोर, साक्री रोड, धुळे ४२४००१ **मो. ९४०३७६२८३४/८०८७७९८७९९**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन- मौजे धुळे म. न. पा. हद्दीतील विस्तारीत सि.स.नं. १६६८३ चे एकूण क्षेत्र २६५ चौ. मी. धारणाधिकार क यापैकी माझे मालकीचा पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र ४४.१७ चौ. मी. यास स. नं. ४३८/२अ/१ब+२अ+१ब२+२ब पैकी प्लॉट नं. ११० क्षेत्र ३७० चौ. मी. यापैकी माझे मालकीचा पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र २९.१७ चौ. मी. यात आर. सी. सी. दोन मजली बांधीव घर नळ इले. मीटर, बोरींग, पाण्याच्या तीन टाकीसह असा बांधीव घराची चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.

वर नमूद वर्णन केलेला बांधीव घर/मिळकत ही अंजुम शे सिकंदर तांबोळी रा. धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरचे घर/मिळकत **आमचे अशिल खाटीक सिकंदर हुसैन रा. धुळे** यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बांधीव घर /मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांरतण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यांस वरील मिळकती ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरून आमचे मार्फत दिली असे. धुळे दि. १५/१०/२०२६

ॲड.लखमीचंद अ. गुजर ॲडव्होकेट व नोटरी
ग. नं. २, घर नं. ३३२६, मुल्लावाडा, धुळे **मो. ९४२३४९३०८९**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन- मौजे धुळे म.न.पा. हद्दीतील स.नं. ४३३/२+४३४ पैकी प्लॉट नं. ४ क्षेत्र १५० चौ. मी. यास सि. स. नं. १८१९४ यापैकी अविभाज्य उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ७५ चौ. मी. यात आर सी. सी. बांधीव घर त्यात हॉल, बेडरुम, किचन, जिना पोर्च संडास, बाथरुम, बोरींग, वीज कनेक्शन तीन पाण्याच्या टाक्यासह असा बांधीव तुम्हांस कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो माझे मालकीचे बांधीव घराची चतु:सिमा मंजूर नकाशाप्रमाणे.

वर नमूद वर्णन केलेला बांधीव घर/मिळकत ही खाटीक सिंकदर हुसैन रा. धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरचे घर/मिळकत **आमचे अशिल आजमशा मजिदशा फकीर रा. धुळे** यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बांधीव घर /मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांरतण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यांस वरील मिळकती ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरून आमचे मार्फत दिली असे. धुळे दि. १५/१०/२०२६

ॲड.लखमीचंद अ. गुजर ॲडव्होकेट व नोटरी
ग. नं. २, घर नं. ३३२६, मुल्लावाडा, धुळे **मो. ९४२३४९३०८९**

जाहीर नोटीस नि.०७

शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जु. डी. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ९६२/२०२६

१) सागर शांताराम चित्ते २) सुनील शांताराम चित्ते
३) सुनिता रवींद्र सोनवणे,
४) निलकंठ शांताराम शिंपी(चित्ते) ... अर्जदार
वि.
कोणीही नाही ... जाबदेणार

मयत कै. सुशीलाबाई शांताराम चित्ते यांचा मृत्यू दि. १५/११/२०११ रोजी मौजे रामसिंग नगर ता. शिरपूर येथील जिल्हा धुळे येथे झाला आहे. अर्जदार नं. १ ते ४ यांनी मे. शिरपूर सिव्हील जज्ज सो. जु. डी. यांचे न्यायालयात बॉम्बे रेग्युलेषण कायदा १८२७ कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज केला असून अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखा मागितला आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व वारसबाबत कुणाची काही हरकत किंवा आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १८/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रत्यक्ष वा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल. दि.१२/१०/२०२६

सही... सही...
कनिष्ठ लिपीक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय,शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

जाहीर नोटीस

अजेदार वकील ॲड. एन. व्ही. पवार

शिंदखेडा येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज नं. ८३१/२०२६

१) श्री.अजय माधवराव देसले
रा.मु.पो.माळीच ता.शिंदखेडा जि.धुळे ...अर्जदार
विरूद्ध
कोणीही नोही ...जाबदेणार
कै.हिराबाई माधवराव पाटील मृत्यू दि.२५/०८/२०२३

ज्याअर्थी अर्जदार यानी कै.हिराबाई माधवराव पाटील हे दि.२५/०८/२०२३ रोजी मौजे माळीच ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झाले आहेत. कै.हिराबाई माधवराव पाटील हे मयत झाल्यानंतर एकमेव अर्जदार नं.१ अजय माधवराव देसले हा मुलगा ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. असा कायदेशीर वारसांचा दाखला मिळण्याचा आदेश होणेस विनंती आहे. तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी या मे.न्यायलायात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू मयताला अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.२४/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोद्राव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार मयताचे कायदेशीर वारस आहेत असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे. न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे.शिंदखेडा दि.१२/१०/२०२६

सही...
(कोर्टाचा शिक्का) सहाय्य अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, शिंदखेडा

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ अन्वये घोषणा

प्रयोजन- पांझरा मध्यम प्रकल्प ता.साक्री जि.धुळे अंतर्गत उजवा वाढीव कालव्यावरील वितरीका क्र.१८ चा भूसंपादन प्रस्ताव.

क्र.भूसंपादन-१/कावि/एस.आर.-०७/२०२४ मौजे निळगव्हाण व नाडसे ता.साक्री जि.धुळे

ज्याअर्थी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र.१, धुळे यांनी खालील परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या जमिनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ चे कलम-११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, दि.१५/०५/२०२५ रोजी प्रारंभीक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनिचा, अनुसूचि दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यक भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र.१, धुळे यांचेकडेस सदर प्राथमिक अधिसूचनेवर ०९ हरकती प्राप्त झालेली आहेत. त्याबाबतचा अहवाल उक्त अधिनियमाच्या कलम-१५ अन्वये समुचित शासन तथा जिल्हाधिकारी, धुळे यांना सादर केलेला आहे; सदर अहवाल विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादन करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले आत असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र.१. धुळे यांस पदनिर्देशित करीत आहे.

सदर जमिनींचे नकाशे व अन्य अभिलेख कार्यालयीन वेळेत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र.१, धुळे यांच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध राहतील.

स्थळ :- धुळे. दिनांक :-

(भाग्यश्री विसपुते, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, धुळे

अनुसूची-१

गावाचे नाव :- मौजे निळगव्हाण व नाडसे ता.साक्री जि.धुळे (एस.आर.नं.०७/२०२४)

अ.क्र.	गावाचे नांव	गट नंबर	संपादन करावयाचे क्षेत्र चौ.मी.		
			हेक्टर	आर	चौ.मी.
१.	निळगव्हाण	४८	०	२०	९८.००
२.	निळगव्हाण	४९	०	१५	६२.००
३.	निळगव्हाण	४४	०	१९	९.००
४.	निळगव्हाण	३७	०	१५	२१.००
५.	निळगव्हाण	३६	०	९	७९.००
६.	नाडसे	२३४	०	४	३६.०२
७.	नाडसे	२३९	०	२२	३३.९३
८.	नाडसे	२३५	०	४	९०.००
९.	नाडसे	२३६	०	७	२२.६१
१०.	नाडसे	२३७	०	१३	५६.७३
११.	नाडसे	२३८	०	८	९३.१३
१२.	नाडसे	२२९	०	३७	१.६५
१३.	नाडसे	२२८	०	२७	४०.२९
१४.	नाडसे	१८२	०	११	६५.२५
१५.	नाडसे	१८३	०	३	६५.०७
१६.	नाडसे	१८४	०	१०	३२.५६
१७.	नाडसे	१८५	०	२२	९५.११
१८.	नाडसे	१८६	०	२८	८७.१५
१९.	नाडसे	१७६	०	१६	८६.८४
२०.	नाडसे	१६०	०	१९	४०.१४
२१.	नाडसे	३६	०	१३	१२.७१
२२.	नाडसे	३७	०	१०	४३.५९
२३.	नाडसे	४०	०	२७	५.५४
२४.	नाडसे	४१	०	५	९८.४२
२५.	नाडसे	४३	०	४	४.६८
२६.	नाडसे	४६	०	१८	१९.२१
२७.	नाडसे	४८	०	८	३०.३२
२८.	नाडसे	५०	०	३	७०.८४
२९.	नाडसे	५१	०	२	३९.०७
३०.	नाडसे	५२	०	२	३७.२१
३१.	नाडसे	५९	०	१०	६९.२५
३२.	नाडसे	५३	०	४	१६.७८
३३.	नाडसे	५५	०	२	६२.००
३४.	नाडसे	५६	०	६	६७.२३
३५.	नाडसे	५७	०	०	७८.७१
३६.	नाडसे	६९	०	२	४५.९०
एकूण संपादीत क्षेत्र –			४ हेक्टर	४३ आर	१६.९४ चौ.मी

अनुसूची- २

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण.

प्रकल्पाचे नांव :- पांझरा मध्यम प्रकल्प ता. साक्री जि. धुळे.

प्रस्तावाचे प्रयोजन :- पांझरा मध्यम प्रकल्प ता. साक्री जि. धुळे अंतर्गत उजवा वाढीव कालव्यावरील वितरीका

क्र.१८ चा भूसंपादन प्रस्ताव, मौजे निळगव्हाण व नाडसे ता.साक्री जि.धुळे.

अनुसूची - ३

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन.

सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती/कुटुंब राहत्या घरातुन विस्थापित होणार नसल्याने पुनर्वसाहत क्षेत्राबाबतचा तपशिल ''निरंक'' आहे.

अनुसूची - ४

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांक्ष

सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती/कुटुंब राहत्या घरातुन विस्थापित होणार नसल्याने पुनर्वसन व पुनर्वसाहत क्षेत्राबाबतचा तपशिल निरंक आहे.

स्थळ :- धुळे. दिनांक :-

(भाग्यश्री विसपुते भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, धुळे.

जाहिरात क्र जिमाका/धुळे/जाहि/११२/२०२६-२७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** –मौजे महिंदळे ता. जि. धुळे येथिल स. नं. ७७/१/ब पैकी प्लॉट नं. १३चे एकूण क्षेत्र २८५ चौ. मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ९५ चौ. मी. अशी मिळकत ही १) सदरची वरील मिळकत ही सुनिता प्रकाश संगतानी रा. धुळे यांनी श्री. भुरा राजाराम हाके रा. धुळे यांना दि. ११/०१/२०१३ रोजी निबंधक सो. धुळे ता. जि. धुळे येथील कार्यालयात खरेदी खत दस्त क्र. २९३/२०१३ अन्वये नोंदणीकृत पद्धतीने विक्री केलेली आहे.

२) तसेच त्यानंतर सदर वरील मिळकत ही श्री. भुरा राजाराम हाके रा. धुळे यांनी श्री. भैय्या बापुराव पवार रा. धुळे यांना दि. ०९/०५/२०१७ रोजी निबंधक सो. धुळे ता. जि. धुळे येथील कार्यालयात खरेदीखत दस्त क्र. १९२७/२०१७ अन्वये नोंदणीकृत पद्धतीने विक्री केलेली आहे.

यासी	मापे व	चतु:सिमा
पुर्वेस :	५ मी.	प्लॉट नं. १६ व १७
पश्चिमेस:	५ मी.	रस्ता
दक्षिणेस :	१९ मी.	प्लॉट नं. १४
उत्तरेस :	१९ मी.	प्लॉट नं. १३

उपरोक्त नमूद वरील दोन्ही खरेदीखत अनुक्रमे दस्त क्र. २९३/२०१३, दस्त क्र. १९२७/२०१७ हे हरविले आहे.

तरी संपूर्ण जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद मिळकतीच्या ७/१२ उतारावर सद्दस्थितीत श्री. प्रफुल्ल भैय्यसाहेब पवार रा. धुळे यांचे खरेदीखतान्वये नावाची नोंद असून सदर मिळकतीबाबत कोणाचाही, कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा वर नमूद मुळ खरेदीखत दस्त कुठल्याही वित्तीय संस्था, बँक, सोसायटी इ. कडे गहाण असल्यास सदर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर कागदपत्रांसह प्रत्यक्ष लेखी हरकत नोंदवावी. विहीत मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल.

ही जाहीर नोटीस दिली असे.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १५/१०/२०२६

ॲड. ललित पांडुरंग देठे **मो. ९४२२७०७१२७४**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींग जवळ, मिल परिसर, धुळे

धुळे महानगरपालिका धुळे

जा.क्र./धुमपा/आस्था/८४६/२०२६
दि.१५/१०/२०२६

लाड व पागे समितीच्या शिफारशीनुसार खालील नमुद से.नि./मयत सफाई कामगारांचे वारसांना सफाई कामगार म्हणून नियुक्ती दयावयाची आहे.

अ. क्र.	सफाई कर्मचाऱ्यांचे नाव	से.नि./मयत दिनांक	वारसदाराचे नाव	वारसाचे नाते	वारसाची जन्म तारीख	वारसाचे वय	वारसाचा जातीचा प्रवर्ग	वारसाची शैक्षणिक अर्हता
१	२	३	४	५	६	७	८	९
१	कै.राकेश राजेश गोयर	८/४/२०२६	श्रीमती सोनाली विक्रम गोयर	नामनिर्देशीत व्यक्ती	२६/१/१९९३	३३	अनु. जाती	१२ वी

तसेच सामाजिक न्याय व विशेष विभागाकडील शासन निर्णय क्र. सफाई-२०१८/प्र.४६/सआक दि.२४/०२/२०२३ अन्वये से. निवृत्त/मयत सफाई कामगारांच्या वारसाना शासन निर्णया मधील मुदा क्र.७ नुसार त्यांच्या शैक्षणिक अर्हतानुसार वर्ग-३ पदावर नियुक्ती देणे बाबत नमुद आहे त्यां नुसार खालील रकाना क्र.४ मधील सफाई कामगारांच्या वारसांना लिपीक पदावर नियुक्ती दयावयाची आहे.

| अ. क्र. | से.नि./मयतसफाई कामगारांचे नाव | से.नि./मयत दिनांक | वारसदाराचे नाव | वारसाचे नाते | वारसाची जन्म तारीख | वारसाचे व

पान १ वरुन

एसटीचा पंधरा टक्के हंगामी भाडेवाढचा प्रस्ताव

कष्टकरी वर्गासाठी एसटी ही परवडणाऱ्या प्रवासाची प्रमुख सुविधा आहे. त्यामुळे प्रवासी भाड्यात वाढ झाल्यास या घटकांच्या दैनंदिन खर्चात भर पडली असती. विशेषतः दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या कुटुंबांना ही वाढ परवडणारी ठरली नसती. एसटी महामंडळाला आर्थिक तोटा सहन करावा लागत असला, तरी त्याची भरपाई सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशातून करणे योग्य नसल्याचे मत सरनाईक यांनी व्यक्त केले. जनतेच्या अडचणींचा विचार करूनच निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अडचणींवर पर्यायी उपाय शोधणार

एसटी महामंडळाच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी पर्यायी उपाययोजना शोधण्याची गरज असल्याचे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले. दुर्गम भागातील गावांपासून शहरांपर्यंत सुरक्षित, विश्वासार्ह आणि परवडणारी प्रवासी सेवा उपलब्ध करून देणे हे एसटी महामंडळाचे मूलभूत कर्तव्य आहे. त्यामुळे आर्थिक तोट्याचा भार थेट प्रवाशांवर टाकण्याऐवजी इतर मार्गांनी त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. जनतेवर संकट असताना खिशावर अतिरिक्त भार टाकण्यापेक्षा दिलासा देणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगत सरनाईक यांनी प्रस्तावित भाडेवाढीला नकार दिला. त्यांच्या या निर्णयामुळे दिवाळीच्या गर्दीच्या काळात एसटी प्रवाशांना अतिरिक्त भाडेवाढीपासून दिलासा मिळाला आहे.

राज्यात सहा नोव्हेंबरपासून एसटी ची चाके थांबणार?

कर्मचाऱ्यांप्रमाणे साठ टक्के महागाई भत्ता लागू करून त्याची थकीत रक्कम देण्यात यावी, अशा प्रमुख मागण्या संघटनांनी केल्या आहेत. तसेच २०२४ ते २०२८ या कालावधीतील वेतन करार सातव्या वेतन आयोगानुसार करण्यात यावा आणि दिवाळीनिमित्त प्रत्येक कर्मचाऱ्याला पंधरा हजार रुपये बोनस देण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. वैद्यकीय सुविधा आणि देणी द्या

एसटी कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस वैद्यकीय योजना सुरू करावी, निवृत्त कर्मचाऱ्यांची प्रलंबित देणी एकरकमी अदा करावीत, तसेच कोरोना काळात सेवा बजावलेल्या कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाची रक्कम देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय खासगी चालकांची भरती करण्याऐवजी २०१९ मधील पात्र उमेदवारांना नोकरीत सामावून घेण्याची मागणी संघटनांनी केली आहे. महिलांना सवलतीच्या दरात प्रवास करताना ईटीआयएम मशीनमध्ये रोख रकमेचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. इलेक्ट्रीक बसेसमुळे महामंडळाचा तोटा वाढत असल्याचा दावा करत या बसेस बंद करण्याची मागणी संघटनांनी केली आहे. या सर्व मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा सहा नोव्हेंबरपासून संपात सहभागी होण्याचे आवाहन कर्मचाऱ्यांना करण्यात आले आहे. कर्मचारी संघटनेच्या मागण्यांवर तोडगा निघाला नाही तर सहा नोव्हेंबरपासून लालपरीची चाके थांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अत्याधुनिक स्वीपर गाड्या व स्वर्गरथ चेसीसचे

सौंदर्यीकरण स्पर्धेत मिळालेल्या प्रोत्साहनात्मक बक्षीस अनुदानातून दोन नवीन स्वीपर गाड्या खरेदी करण्यात आल्या आहेत. यापूर्वी नगरपालिकेकडे तीन स्वीपर मशीन आणि तीन ट्रॅक्टर-माउंटेड स्वीपर मशीन उपलब्ध आहेत. आता आणखी दोन स्वीपर गाड्यांची भर पडल्याने शहराच्या स्वच्छता व्यवस्थेसाठी उपलब्ध यंत्रसामग्रीत वाढ झाली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, वर्दळीची ठिकाणे आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी या गाड्यांचा उपयोग होणार आहे. रस्त्यांवरील धूळ आणि कचरा हटविण्याच्या कामाला यामुळे गती मिळण्याची अपेक्षा आहे. यांत्रिक साधनांचा प्रभावी वापर केल्यास स्वच्छता कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यास आणि स्वच्छता मोहिमेची कार्यक्षमता वाढविण्यास मदत होऊ शकते.

स्वर्गरथासाठी नवीन चेसिस; बॉडी बांधणीचे काम पूर्ण करून सेवा नागरिकांना आवश्यक सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नगरपालिकेच्या निधीतून स्वर्गरथासाठी नवीन चेसिस खरेदी करण्यात आली आहे. या चेसिसवर आवश्यकतेनुसार बॉडी बांधणीचे काम करण्यात येणार आहे. कुटुंबातील व्यक्तीच्या निधनानंतर अंत्यसंस्कारासाठी वाहनाची आवश्यकता भासते. अशा वेळी स्वर्गरथाची सुविधा नागरिकांसाठी उपयुक्त ठरू शकते. नवीन चेसिसवर बॉडी बांधणीचे काम पूर्ण झाल्यानंतर हे वाहन नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या सुविधेच्या माध्यमातून सार्वजनिक सेवेचा विस्तार करण्यास मदत होईल.

नागरी सुविधांच्या बळकटीकरणावर भर

आमदार अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या आदेशान्वये शहरातील नागरी सुविधांच्या विकासासाठी प्रयतक केले जात आहेत. शहर स्वच्छता व सौंदर्यीकरण स्पर्धे अंतर्गत मिळालेल्या प्रोत्साहनात्मक अनुदानातून स्वीपर गाड्यांची खरेदी करण्यात आली, तर स्वर्गरथासाठी नगरपालिकेच्या निधीतून नवीन चेसिस घेण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे शिरपूर शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला आधुनिक साधनांची जोड मिळाली असून, नागरिकांना आवश्यक सुविधा पुरविण्याच्या प्रयतकांना बळ मिळणार आहे. स्वच्छ, सुंदर आणि सुविधायुक्त शिरपूर घडविण्याच्या दृष्टीने नगरपालिकेच्या ताफ्यात दाखल झालेली ही वाहने महत्त्वाची ठरणार आहेत.

मतदार यादीत नाव नोंदणीसाठी विशेष मोहीम

पात्र नागरिकांनी विशेष शिबिरांचा लाभ घेऊन आपली नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदार नोंदणी आणि मतदार यादीतील दुरुस्तीसाठी निवडणूक आयोगाने विविध अर्जांचे नमुने उपलब्ध करून दिले आहेत. नमुना अर्ज क्रमांक ६ हा मतदार यादीत नवीन नाव नोंदविण्यासाठी. नमुना अर्ज क्रमांक सात मतदार यादीतील नावावर आक्षेप नोंदविण्यासाठी किंवा नियमानुसार नाव वगळण्याची विनंती करण्यासाठी. नमुना अर्ज क्रमांक आठ हा निवासस्थान बदल, वैयक्तिक तपशिलातील दुरुस्ती, नवीन मतदार ओळखपत्र मिळविणे किंवा दिव्यांग मतदार म्हणून नोंद करण्यासाठी. नवीन मतदार नोंदणीची प्रक्रिया वर्षभर सुरू असते. त्यामुळे अद्याप मतदार म्हणून नोंदणी न झालेल्या पात्र नागरिकांनाही नमुना अर्ज क्रमांक ६ भरून अर्ज करता येणार आहे.

अडचणीत १९५० हेल्पलाइन क्रमांक

मतदार यादीतील नाव तपासताना, अर्ज भरताना किंवा नोंदणी प्रक्रियेदरम्यान काही अडचण अथवा तक्रार असल्यास नागरिकांनी १९५० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा. याशिवाय संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातील जिल्हास्तरीय मदत केंद्र किंवा विधानसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाच्या मदत केंद्राची मदत घेता येईल. जिल्हानिहाय मतदार हेल्पलाइन आणि मदत केंद्रांचा तपशील मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पात्र नागरिकांनी १७, १८, २४ आणि २५ ऑक्टोबर रोजी आयोजित विशेष शिबिरांचा लाभ घ्यावा, मतदार यादीतील आपले नाव व तपशील तपासावेत आणि आवश्यक दावे व हरकती २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सादर कराव्यात, असे आवाहन निवडणूक विभागाने केले आहे.

अनिल नगरात घरफोडी रोकड, दागिने लंपास

कुलूप तोडून अनधिकृतपणे घरात प्रवेश केला. त्यानंतर सोन्याची पेंडल असलेली चैन (२५ ग्रॅम, किंमत १ लाख ५० हजार रुपये), सोन्याचे मंगळसूत्र (२५ ग्रॅम, किंमत १ लाख ५० हजार रुपये), सोन्याच्या दोन अंगठ्या (५ ग्रॅम, किंमत ६० हजार रुपये), चांदीचे पैंजण, जोडवी, गणपती व लक्ष्मीच्या मूर्ती आणि जास्वंदीच्या फुलासह अन्य चांदीच्या वस्तू चोरून नेल्या.

निधी द्या, अन्यथा शहादा नगरपालिका गुजरात किंवा

स्वीकारावे, अशी अपेक्षा व्यक्त होत असताना निधी रोखून त्यांच्यावर दबाव आणला जात आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. मात्र, या आरोपांवर प्रशासनाची अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. विकासकामांसाठी निधी मिळवताना सत्ताधारी पक्षात असणे हा निकष असेल, तर हा कोणता न्याय, असा सवाल पाटील यांनी केला. निधी मिळवण्यासाठी टक्केवारीची अट असेल, तर आम्ही टक्केवारी देतो; मात्र शहादा नगरपालिकेला विकासकामांसाठी निधी द्या, अशी आर्त हाकही त्यांनी उपोषणादरम्यान दिली. लाक्षणिक उपोषणानंतरही निधीचा प्रश्न मार्गी लागला नाही, तर नगरपालिकेला टाळे ठोकून अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नगराध्यक्ष पाटील यांनी दिला. दसऱ्यानंतर आंदोलनाचे खरे रौद्ररूप पाहायला मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे शहादा नगरपालिकेच्या निधीचा प्रश्न आणि नगराध्यक्षांनी दिलेला आंदोलनाचा इशारा याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

दुष्काळ निवारणासाठी संधारणाच्या कामांना गती द्या

या योजनांचा संयुक्त आढावा घेण्यात आला. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी (रोहयो) बालाजी क्षीरसागर, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता सचिन शिंदे, उपअभियंता जितेंद्र पाटील यांच्यासह सर्व संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांची प्रगती, उपलब्ध निधी, प्रस्तावित कामे आणि आगामी नियोजनाबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, धुळे जिल्ह्यातील अनेक गावांना पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या समस्येला सामोरे जावे लागते. त्यामुळे केवळ पाणी उपलब्ध करून देण्यापुरते नियोजन मर्यादित न ठेवता गावागावांत पाणी साठविण्याची आणि भूजल पुनर्भरणाची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. जुन्या जलसंधारण संरचनांचे पुनरुज्जीवन, बंधाऱ्यांची दुरुस्ती, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण आणि पाणलोट विकासाची कामे करताना स्थानिक भौगोलिक परिस्थिती व गावांची गरज विचारात घ्यावी. विविध विभागांनी समन्वयाने काम केल्यास जलसंधारणाच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देता येईल.

जलयुक्त शिवारच्या ७० गावांत १,३०३ कामे पूर्ण जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत जिल्ह्यातील ७० गावांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये धुळे तालुक्यातील १७, शिरपूर १७, शिंदखेडा १९ आणि साक्री तालुक्यातील १७ गावांचा समावेश आहे. सर्व गावांच्या शिवारफेऱ्या पूर्ण झाल्या असून आराखडे तयार करण्यात आले आहेत. सुधारित आराखड्यानुसार १,३१३ कामांचे नियोजन असून त्यापैकी १,३०३ कामे पूर्ण झाली आहेत, तर १० कामे प्रगतिपथावर आहेत. या कामांवर आतापर्यंत सुमारे २२ कोटी ३३ लाख रुपयांचा खर्च झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या कामांचा केवळ संख्यात्मक आढावा न घेता प्रत्यक्ष जलसाठा, भूजल पुनर्भरण आणि शेतकऱ्यांना होणारा फायदा याचाही विचार करण्याची गरज जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी व्यक्त केली. विशेष निधीतील शिल्लक रकमेतून आवश्यक कामांचे पुनर्नियोजन, सुधारित आराखडे, कामांची प्रशासकीय मान्यता आणि प्रगतिपथावरील कामे यांचा यावेळी आढावा घेण्यात आला. पूर्ण झालेल्या कामांचे त्रयस्थ मूल्यमापन, जिओटॅगिंग आणि संबंधित गावांचे जलपरिपूर्णता अहवाल तयार करण्याबाबतही चर्चा झाली. उर्वरित कामे पूर्ण करण्याबरोबरच झालेल्या कामांची गुणवत्ता आणि परिणामकारकता महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गाळमुक्त धरणातून शेतीला नवी उभारी धरणे आणि तलावांमध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ काढल्यास जलसाठ्यांची क्षमता वाढण्यास मदत होते. हाच गाळ शेतात पसरविल्यास जमिनीची सुपीकता वाढण्यासही हातभार लागू शकतो. त्यामुळे गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार ही योजना जलसुरक्षा आणि कृषी विकास या दोन्ही दृष्टीने महत्त्वाची असल्याचे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सांगितले.

घरफोडी करणारी आंतरराज्य टोळी

व मार्गदर्शनानुसार केलेल्या तांत्रिक विश्लेषणाद्वारे अकरम अब्दुल गफार अब्बासी (वय ४५, रा इंदूर, म. प्रदेश), त्याचा भाऊ जावेद अब्दुल गफार अब्बासी (रा. मदीना नगर, इंदुर, म.प्रदेश) यांनी दिवसा घरफोडी केल्याची माहिती निष्पन्न झाली. दोन्ही आरोपी त्यांच्या घरीच असल्याची माहिती मिळाली. आरोपींचा शोध घेण्यासाठी पथक रवाना झाले. पथकाने इंदुर येथून मुख्य आरोपी अकरम अब्दुल गफार अब्बासी यास ताब्यात घेत सखोल विचारपुस केली, त्याने त्याचा भाऊ जावेद अब्बासी यांनी घरफोडीची कबुली दिली. त्याचा भाऊ जावेद बाहेर गावी गेला आहे. आरोपी अकरम अब्बासी याच्याकडे चोरीच्या मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता सोने-चांदीचे दागिने बनविणारा कारागीर शेख बासेद शेख सबुर (वय ५१, रा.७७/१, रजपाली मार्ग, देवास, म.प्रदेश) यास विक्री केल्याचे सांगीतले. पथकाने आरोपीसह देवास येथे जावुन शेख बासेद शेख सबुर याचेकडे विचारपुस केली असता, त्याने सोने-चांदीचे दागिने विकत घेतल्याचे सांगुन ते काढुन दिले, पोलिसांनी ते हस्तगत केले. सोन्याचे टोंगल, सोन्याची लगड वजा गोळी, चांदीची लगड असा एकुण ५ लाख ६९ हजार ४५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. तांत्रिक विश्लेषणाद्वारे दिवसा घरफोडी करणारे दोन आरोपी निष्पन्न केले. मुख्य आरोपी व चोरीचे दागिने खरेदी करणारा ताब्यात घेतले. दिवसा घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. फरार आरोपी जावेद अब्बासी याचा शोध घेण्यात येत आहे.



पगडी रस्म

धुळे बार असोसिएशन चे सन्माननीय सदस्य ॲड.श्री.चंदन आय रेलन यांच्या मातोश्री कै.श्रीमती बिम लादेवी इंद्रलाल रेलन यांचा अल्पशा आजारामुळे मुंबई येथील जे.जे. हॉस्पिटल मध्ये दि.१३/१०/२०२६ रोजी निधन झाले आहे. त्यांचा अंतिम संस्कार विधी दि.१४/१०/२०२६ रोजी धुळे येथे करण्यात आला असून पगडी रस्म शुक्रवार दि.१६/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता मातोश्री हॉल बहावलपुरी पंचायत भवन कुमारनगर साक्रीरोड धुळे येथे ठेवण्यात आला आहे.

शोकाकुल समस्त रेलन परिवार, धुळे
मो.नं.८६२४०८८६३८

धुळ्यात 'प्लास्टो' आणी इतर सर्व नामांकित कंपनीच्या पाण्याच्या टाक्या आमच्याकडे होलसेल रेटमध्ये उपलब्ध आहेत..



१०० ते १०,००० लिटर पर्यंत गोल व चौरस टाक्या होलसेल रेट व हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहे.

धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण...

शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
फो. 9422285091



हस्ती ग्रुप ऑफ स्कूलमध्ये विज्ञान प्रश्नमंजुषा उपक्रम उत्साहात संपन्न

दोंडाईचा, दि.१५-हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज, हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा येथे भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ, आणि युवकांचे प्रेरणास्थान डॉ. ए.पि.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या औचित्याने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा तसेच सामान्य विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञानात भर पडावी या उद्देशाने विज्ञान प्रश्नमंजुषा उपक्रमाचे हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. ए. पि. जे. अब्दुल कलाम व श्रद्धेय स्व. दादाजी हस्तीमलजी जैन, आदरणीय स्व. पप्पाजी शांतीलालजी जैन, आदरणीय स्व. काकाजी कांतीलालजी जैन यांच्या प्रतिमेचे पूजन स्कूलचे हेड बॉय व हेड गर्ल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्या रझिया दाऊदी, प्राचार्य जिवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन, प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर तसेच सर्व समन्वयक उपस्थित होते.

सदरील स्पर्धा स्कूल निहाय प्रत्येकी दोन गटात घेण्यात आली. हस्ती पब्लिक स्कूल येथे इ.३ ते इ. ५ विच्या गटात ब्लू हाऊसचे विद्यार्थी गुणवंत कन्हैयालाल धनगर, कल्याणी गावित, गौरेश दिपक जाधव यांनी तर इ. ६ वि ते इ. ९ विच्या गटात रेड हाऊस चे रोहित प्रदिप वाधवानी, तनिष महेंद्र जैन, छत्रपाल महेंद्र निकम, दक्षिता भगवान जयपाल यांनी प्रथम क्रमांक मिळविला. हस्ती वर्ल्ड स्कूल येथे इ. ३ री ते इ. ५ विच्या गटात रेड हाऊस चे चैतन्य अधिकार धनगर, विधी सचिन सोनवणे, श्रेया मनोज महाजन यांनी तर इ. ६ वि ते इ. ९ विच्या गटात रेड हाऊस चे शौर्य किशोर घरटे, दिया अविनाश पाटील, रोहन चंद्रकांत शिसोदे, वैभव अतुल वाघ यांनी प्रथम क्रमांक मिळवला. त्याच बरोबर हस्ती गुरुकुल येथे इ. ३ री ते इ.५ विच्या गटात ब्ल्यू हाऊस चे यज्ञेश महेश सनेर, साक्षी भरत शिंदे, मनीष सतीश बच्छाव यांनी तर इ. ६ वि ते इ. ९ विच्या गटात रेड हाऊस चे राहुल तुकाराम अहिरे, धनंजय प्रेमचंद पाटील, भावेश तुकाराम सोनवणे, अविनाश सावता माळी यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता विज्ञान विभाग प्रमुख प्रतिष्ठा परमार, सुमित चव्हाण, मयुरेश अग्रवाल,जयपाल राजपूत, गोविंद माळी, स्वप्निल माळी, प्रशांत अहिरे, सचिन पाटील, शाकिर खाटीक, दीपक मराठे, विशाल बच्छाव, भूषण बोरसे, अविनाश वाघ, आरवा कटलरी, सुवर्णा सोनवणे, अनु जाधव, सुचिता जाधव, मोनाली मिस्तरी, भाग्यश्री चौधरी यांनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमाचे परीक्षक कपिल सोनवणे, अनुप चौरसिया, ज्योती बोरसे , शितल पाटील, हर्षल पवार, मोहसीन शेख यांनी कार्य पाहिले.

शब्दसाधनाचा कार्यक्रम कलावंतांना आवाहन

धुळे, दि.१५- शहरातील साहित्य व कला क्षेत्रात कार्यरत असलेल्या शब्दसाधना संस्थेच्यावतीने दि.१० नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता दीपावली पाडवा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन इच्छुक कलावंतांना आयोजकांनी केले आहे.

कलावंतांना हक्काचे व्यासपीठ शब्दसाधनाच्यावतीने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रत्येकांत दडलेला कलावंत बाहेर काढण्यासाठी संधी मिळणार आहे. इच्छुक कलावंतांनी दि.२२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत नाव नोंदणी करावयाची आहे. कार्यक्रमात सहभागासाठी दर्शनकुमार नेरकर ९८६०३६९५६६ व सुनंदा वैद्य ९८२३१२६०२४ यांच्याशी संपर्क साधावा. सहभागासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. असे शब्दसाधना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

विकणे आहे

पंचवटी टॉवर मधील २ च्या माळ्यावरील हॉल साधारण २००० चौ. फुट व ५०० चौ. फुट बसमेंट हॉल, ४०० चौ. फुट देवपूर धुळे
बँक ऑफ महाराष्ट्र समोर,
-: संपर्क :-
9823028632

भाड्याने देणे आहे

कन्सल्टींग रूम्स्
डायटेशियन,
फिजीयोथेअरपिस्ट,
त्वचारोग तज्ञ,
यांसाठी
आशा हार्ट केअर सेंटर
स्टेशन रोड, धुळे
7385297921

फ्लॅट विकणे आहे

चंपाबाग साक्री रोड धुळे येथील पहिल्या मजल्यावरील
1 BHK Flat
विकणे आहे.
-: संपर्क :-
9421534949
7498317318

पाहिजे

दुकान कामासाठी माणूस पाहिजे.
स्वतःचे दुचाकी वाहन असल्यास प्राधान्य.
पत्ता :- ग.नं. ५ धुळे
9765373559

पाहिजेत

अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
गल्ली नं. २, अकबर चौक, धुळे
9422286958

पाहिजेत

मांसाहारी कारागीर : १
हेल्पर : २
वेटर : २
-: संपर्क :-
9422798178
8007124449

धुळे वासीयांच्या सेवेत दाखल
आरोग्यम फिजयोथेरॅपी & रिहॅबलीटेशन सेंटर
अद्यावत सुविधा उपलब्ध
* Neck pain * Stroke Rehab
* Back Pain * Post Surgical Rehab
* Knee Pain * Electro Therapy
* Shoulder Pain * Manual Therapy
* Sports Injury * Exrecise Therapy
* Paralysis * Pain Management
Dr.Rushali Nagarkar
(B.P.T, M.P.T. Musculoskeletal & Sport PT)
संपर्क- डॉ.साळुंखे च्या वर, क्रांती चौक, पहिला मजला, धुळे
मो.नं.९३७३३१०६९६

पान १ वरुन

महिला केवळ शेतीचा आधार नाहीत तर कुटुंबाला

घर, मुले, शेती आणि कुटुंबाची जबाबदारी ती समर्थपणे सांभाळते. संकटात कुटुंबातील इतर सदस्य हतबल झाले, तरी महिला खंबीरपणे उभी राहते. मुलांचे शिक्षण, संगोपन, शेती आणि रोजगारासाठी ती स्वतःच्या कष्टांची पर्वा करत नाही. संकटातून पुन्हा उभे राहण्याचे सामर्थ्य मातृशक्तीमध्ये आहे. खानदेशातील महिलांचे शेतीतील योगदान मोठे आहे. त्यांची भूमिका केवळ शेतावर जेवणाचा डबा पोहोचविण्यापुरती मर्यादित नसून पेरणी, निंदणी, कोळपणीपासून शेतीच्या प्रत्येक कामात त्या सहभागी असतात. शेती टिकविण्यात आणि पुढील पिढीचे भविष्य घडविण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.

मातृशक्तीचा सन्मान तिच्या प्रगतीतून दिसला पाहिजे

भारतीय संस्कृतीत मातृशक्तीला हजारो वर्षांपासून आदराचे स्थान आहे. नवरात्रोत्सवात आपण देवीच्या विविध रूपांची आराधना करतो. मात्र, हा सन्मान महिलांच्या दैनंदिन जीवनात, अधिकारांमध्ये आणि प्रगतीच्या संधींमध्येही दिसला पाहिजे. योग्य संधी मिळाल्यास महिला कुटुंबाबरोबरच संपूर्ण गावाच्या विकासालाही चालना देऊ शकतात, असा विश्वास पालकमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

विकसित भारतात महिलांचा वाटा बरोबरीचा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू करण्यात आलेल्या सेवा संकल्प अभियानातून विकसित भारताचा संकल्प करण्यात आला आहे. सन २०४७ पर्यंत विकसित भारत घडविताना महिलांना समान जबाबदारी, अधिकार आणि हक्क मिळाले पाहिजेत. देशाच्या प्रगतीत माता-भगिनी आणि मुलींना समान भागीदार करूनच पुढे जायचे आहे, असे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. लखपती दीदी योजना, महिला शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजना आणि बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी आधुनिक शेती, पूरक व्यवसाय व रोजगाराच्या संधी स्वीकाराव्यात. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यास कुटुंबाचे शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अडचण कोणतीही असो, तुमचा जयकुमार भाऊ सदैव तत्पर!

महिला शेतकऱ्यांशी आपुलकीने संवाद साधताना पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लाडक्या बहिणींच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. राज्य शासन महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्नशील आहे. कोणतीही अडचण किंवा मदतीची गरज भासल्यास महिलांनी हक्काने सांगावे. तुमचा जयकुमार भाऊ तुमच्यासाठी सदैव तत्पर आहे. तुमची कामे मार्गी लावण्यासाठी मी निश्चित प्रयत्न करेन, अशा शब्दांत त्यांनी विश्वास दिला.

पोलीस असल्याची बतावणी करत

रुपये, गळ्यातील साडेतीन तोळ्याची सोन्याची पोत, किंमत ९४ हजार ५०० रुपये, तसेच रुपसिंग गिरासे यांच्या बोटातील १ तोळ्याची सोन्याची अंगठी, किंमत २७ हजार रुपये आणि पाकिटातील २ हजार रुपये रोख असा एकूण ३ लाख १२ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरीस गेला. दोन मोटारसायकलींवरून आलेल्या चार अनोळखी इसमांनी पोलीस असल्याचे भासवून ही फसवणूक केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पुढील तपासाबाबतची माहिती उपलब्ध नाही.

ऑनलाइन गेममध्ये तरुणाची अडीच लाखात फसवणूक

दुप्पट करण्याचे आमिष दाखवले. हेमंत वाघमारे याने विश्वास ठेवून यूपीआय व ऑनलाइन बँकिंगद्वारे विविध खात्यात दोन लाख ५० हजार ५५ रुपयांची गुंतवणूक केली. काही दिवसानंतर आर्थिक फसवणूक झाल्याचे हेमंत वाघमारे याच्या लक्षात आले. या प्रकरणी धुळे सायबर पोलिस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक सुरेशकुमार घुसर यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार भूषण खलाणेकर तपास करीत आहेत.

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...

Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
JAPAN PREMIUM

सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

BAJAJ FINSERV | HDB FINANCIAL SERVICES

*नियम व अटी लागू

श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०